# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 15 May 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १५ मे २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- दहशतवादाविरोधात सैन्यदलांनी दाखवलेल्या शौर्याचं राष्ट्रपतींकडून कौतुक
- नक्षलवादाचा बिमोड करण्याकडं सरकारची वाटचाल, पंतप्रधांचं प्रतिपादन
- ऑपरेशन सिंदूरनंतर देशभर तिरंगा यात्रेचं आयोजन
- लातूर जिल्ह्यात अवकाळी पावसामुळं चार जनावरांचा मृत्यू, नुकसानीचे तातडीनं पंचनामे करण्याची काँग्रेसची मागणी

आणि

- खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेचा आज समारोप- १४९ पदकांसह महाराष्ट्र अव्वल

****

दहशतवादाचा बिमोड करण्यात सैन्यदलांनी दाखवलेल्या शौर्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कौतुक केलं आहे. तिन्ही संरक्षण दलांचे मुख्य, सीडीएस जनरल अनिल चौहान, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, हवाईदल प्रमुख एअरचीफ मार्शल ए.पी. सिंग, आणि नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन त्यांना ऑपरेशन सिंदूरबाबत माहिती दिली.

****

ऑपरेशन सिंदूर बद्दल सर्वसामान्य नागरिकांकडून समाधान व्यक्त केलं जात आहे. १९७१ च्या भारत पाक युद्धात देशाच्या पश्चिमी सीमेवर तोफखाना सांभाळलेले आणि सध्या छत्रपती संभाजीनगर इथं वास्तव्यास असलेले निवृत्त कॅप्टन सुरेंद्र सुर्वे यांनी ऑपरेशन सिंदूरबद्दल बोलतांना, पाकिस्तानला धडा शिकवणं गरजेचं होतं, असं मत व्यक्त केलं. ते म्हणाले..

**बाईट – निवृत्त कॅप्टन सुरेंद्र सुर्वे**

****

भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांनी काल शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पदाची शपथ दिली.

**बाईट – राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि सरन्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई**

नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात झालेल्या या सोहळ्याला उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

****

नक्षलवादाविरोधातील सुरक्षा दलांच्या यशातून नक्षलवादाचा बिमोड करण्याकडं यशस्वी वाटचाल सुरु आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. केंद्रीय गृहमंत्री यांच्या नक्षलवादाविरोधातील कारवाईच्या समाजमाध्यमावरील संदेशाला पंतप्रधानांनी सामायिक केलं. दरम्यान, छत्तीसगडमध्ये २१ दिवस चाललेल्या कारवाईत ३१ नक्षलवादी ठार झाल्याची माहिती केंद्रीय राखीव पोलीस दलानं काल पत्रकारपरिषदेत दिली.

****

केंद्र सरकारनं उत्तरप्रदेशात गौतम बुद्ध नगर जिल्ह्यात सेमी कंडक्टर प्रकल्प उभारण्यास मंजुरी दिली आहे. काल केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याचं, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे देशाला मोठं बळ मिळाल्याकडे वैष्णव यांनी लक्ष वेधलं, ते म्हणाले...

**बाईट – अश्विनी वैष्णव, माहिती आणि प्रसारण मंत्री**

****

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या वतीनं देण्यात येणारे पुरस्कार काल जाहीर करण्यात आले. `स्वातंत्र्यवीर सावरकर शौर्य` पुरस्कार यंदा मराठा लाइट इन्फंट्रीचे मेजर अनिल अर्स यांना जाहीर झाला आहे. तर,'स्वातंत्र्यवीर सावरकर विज्ञान पुरस्कार' आयआयटी मुंबईचे शास्त्रज्ञ मिलिंद अत्रे यांना जाहीर झाला आहे. मानपत्र, स्मृतिचिन्ह, आणि रोख रक्कम असं या दोन्ही पुरस्कारांचं स्वरूप आहे.

****

महाविद्यालयीन युवकांनी 'MY भारत' पोर्टलवर सिव्हिल डिफेन्स वॉरिअर म्हणून नोंदणी करण्याचं आवाहन उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलं

आहे. केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांच्या अध्यक्षतेखाली काल सर्व राज्यातल्या राष्ट्रीय सेवा योजना पदाधिकाऱ्यांसोबतची ऑनलाइन बैठक झाली, त्यावेळी पाटील यांनी हे आवाहन केलं.

****

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त काल त्यांना सर्वत्र अभिवादन करण्यात आलं. नांदेड इथं अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष पंजाबराव काळे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

छत्रपती संभाजीनगर इथं मिरवणुका तसंच इतर कार्यक्रमातून संभाजी महाराजांना अभिवादन करण्यात आलं. विलासबापू भुमरे प्रतिष्ठानच्या वतीने क्रांती चौक परिसरात साडे चार क्विंटल गव्हाचा वापर करून छत्रपती संभाजी महाराज यांची प्रतिमा साकारण्यात आली.

****

ऑपरेशन सिंदूरनंतर भारतीय जनता पक्षानं देशभर तिरंगा यात्रेचं आयोजन केलं आहे. येत्या २३ मे पर्यंत तिरंगा यात्रा देशभर सुरू राहणार आहे. दक्षिण मुंबईतल्या ऑगस्ट क्रांती मैदानातून काल मुंबई भाजपानं तिरंगा यात्रा काढली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यात सहभागी झाले होते. ऑपरेशन सिंदूरमुळे भारतीय सैन्याची शक्ती जगाला समजली, अशी भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली, ते म्हणाले...

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

दरम्यान, बीड जिल्ह्यात परळी इथं आज भव्य तिरंगा रॅलीचं आयोजन करण्यात आलं आहे. या रॅलीत सर्व नागरिकांनी उत्साहाने सहभागी होण्याचं आवाहन भाजपा शहराध्यक्षा उमा समशेट्टे यांनी केलं आहे.

****

लातूर जिल्ह्यातल्या उदगीर तालुक्यात काल झालेल्या पावसात कल्लूर, खेर्डा, बामणी या गावांमध्ये वीज पडून ०४ जनावरे ठार झाली. तर हंगरगा इथल्या कुक्कुटपालन केंद्राची पत्रे उडाले आणि कुक्कुट व्यवसायिकाच्या शेकडो कोंबड्या दगावल्या. काही ठिकाणी गोडाऊनची पत्रे उडल्याने गोडावूनमधील मक्याची पोती पावसामुळे भिजून मोठं नुकसान झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

बीड जिल्ह्यात पाच ते १३ मे या कालावधीत अवकाळी पावसामुळे सुमारे १८ हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं तर तिघांचा वीज पडून मृत्यू झाल्याची प्राथमिक नोंद महसूल विभागाच्या वतीने करण्यात आली आहे.

****

अवकाळी पावसानं शेतीच्या झालेल्या नुकसानाचे तातडीनं पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. १ रुपयात पीक विमा योजना ही पुन्हा लागू करावी, बोगस बियाणे विकणाऱ्यांवर कारवाई करावी, अशा मागण्याही त्यांनी केल्या. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या बलिदान दिनी, २१ मे रोजी राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये तिरंगा यात्रा काढणार असल्याची माहिती सपकाळ यांनी यावेळी दिली.

****

लातूर तालुका काँग्रेस कमिटीच्या शिष्टमंडळानंही तातडीनं नुकसानाचे पंचनामे करण्याची मागणी केली आहे. या मागणीचं निवेदन काल लातूरच्या तहसीलदारांकडे सादर करण्यात आलं.

****

धाराशिव इथं आज पत्रकारांसाठी ‘हवामान बदल, दुष्काळ आणि हवामान संकटाची पूर्वसूचना प्रणाली’ या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं आहे. बाईमाणूस रिसर्च मीडिया फौंडेशन,आरएससीडी आणि जिल्हा पत्रकार संघातर्फे संयुक्तपणे आयोजित या कार्यशाळेचा पत्रकारांनी लाभ घ्यावा, असं आवाहन आयोजकांनी केलं आहे.

****

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेचा आज समारोप होत आहे. या स्पर्धेत १४९ पदकांची कमाई करत महाराष्ट्र पदक तालिकेत अव्वल स्थानावर आहे. यात ५६ सुवर्ण, ४५ रजत आणि ४८ कांस्यपदकांचा समावेश आहे. या स्पर्धेत हरियाणा १०७ तर राजस्थान ५५ पदकांसह अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत.

****

पैठण इथल्या जायकवाडी धरणाचे दोन दरवाजे काल सायंकाळी उघडून १०० दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद वेगाने गोदावरी पात्रात पाणी सोडलं जात आहे.

नदीकाठच्या नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी, असं आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.

****

हवामान

राज्यात काल सर्वाधिक ४२ पूर्णांक दोन दशांश सेल्सिअस तापमान ब्रह्मपुरी इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात परभणी इथं ३६, छत्रपती संभाजीनगर इथं ३६ पूर्णांक आठ, तर बीड इथं ३८ पूर्णांक दोन दशांश सेल्सिअस अधिक तापमानाची नोंद झाली. दरम्यान, आज बीड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

****